रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी
## महिला सहकारी बँक लि., म्हसवड
### ता. माण, जि. सातारा

**१६ वा** वार्षिक अहवाल सन २०१२-२०१३
ऑडीट वर्ग 'अ'

# संचालक मंडळ (सन २०११-१२ ते २०१६-१७)

श्रीमती चेतना वि. सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)

सौ. गीता ग. रसाळ
उपाध्यक्षा (म्हसवड)

माण देशी बँक

(गोंदवले खुर्द)

सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)

सौ. निर्मला म. मोरे
संचालिका (गोंदवले खुर्द)

सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)

सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)

सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)

सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)

सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)

सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)

सौ.राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)

सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)

सौ. शारदा बा. मदने
संचालिका (बनगरवाडी)

सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)

सौ. रेखा अ कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)

सौ. नूतन प्र. शेटे
संचालिका (वडूज)

सौ. कांचन कि. शिंदे
संचालिका (बोथे)

सौ. स्नेहलता बा. आटपाडकर
संचालिका (वर-मलवडी)

सौ. अरूणा अ. सावंत
संचालिका (क्षेत्र माहुली)

श्री. काशीनाथ द. राऊत
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)

श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण (बाबा), मा. आमदार जयकुमार गोरे माणदेशी चारा छावणीला भेट देऊन माहिती घेताना सोबत श्रीमती चेतना सिन्हा.

मुख्य महाप्रबंधक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया श्रीमती सुरेखा मरांडी यांनी माणदेशी बँक शाखा सातारा येथे भेट देऊन बँकेच्या कार्याची माहिती घेतली त्या प्रसंगीचे छायाचित्र सोबत श्रीमती चेतना सिन्हा व बँकेचा कर्मचारी वर्ग.

२७ मे २०१३ रोजी 'माणदेशी बँक शाखा धायरी, पुणे शाखेच्या उद्घाटन प्रसंगी 'मा. श्री. दिनेश ओऊळकर, अपर निबंधक सहाकारी संस्था, 'महाराष्ट्र राज्य पुणे, शेतकरी संघटनेचे नेते 'मा. श्री. शरद जोशी यांच्या समवेत श्रीमती चेतना सिन्हा व बँकेच्या उपाध्यक्षा सौ. गीता रसाळ.

माणदेशी बँक शाखा सातारा वर्धापन दिनानिमित्त आयोजीत केलेल्या ''माणदेशी मार्केटिंग महोत्सवास'' मा. श्री. एम. के. प्रसन्ना यांनी भेट दिली त्यावेळचे छायाचित्र.

''माणदेशी मार्केटिंग महोत्सव'' २०१३ च्या स्टॉल ला भेट देऊन माणदेशीची खासीयत असलेल्या आधुनिक जेन विषयी माहिती घेताना मा. श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले, मा. सौ. अरूणादेवी पिसाळ अध्यक्षा सातारा जिल्हा परिषद, मा. सौ. सुवर्णादेवी पाटील, नगरसेविका सातारा सोबत श्रीमती चेतना सिन्हा.

मा. श्री. आनंदराव कटके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा यांचा सत्कार करताना श्रीमती चेतना सिन्हा सोबत सौ. रेखा कुलकर्णी व सौ. वनिता जाधव

# १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २१।९।२०१३ रोजी दुपारी १२ वाजता माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दिनांक ९-४-२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०१२-२०१३ मधील नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०१२-२०१३ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१२-२०१३ चे शासकिय लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
६. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
७. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८. सन २०१३-२०१४ सालाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०१२- २०१३ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला आहे. त्यास मान्यता देणे.
९. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत चर्चा करणे.
१०. पोट नियम दुरुस्तीबाबत चर्चा करणे.
११. स्टाफिंग पॅटर्नला मंजूरी देण्याबाबत.
१२. शाखा विस्तारास मान्यता देणे .
१३. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
१४. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरुन
**माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

दि. ०७/०९/२०१३
सभेचे स्थळ :- माण देशी फौंडेशन,नविन इमारत,
सातारा-पंढरपूर रोड,भागवत एजन्सीज शेजारी म्हसवड
वेळ: दुपारी १२ वा.

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड

विशेष सुचना :-
१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल.
२. सभेच्या वेळी विचारावयाचे प्रश्न आणि सुचना दि. १४/०९/२०१३ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात. ३. संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात आणि सर्व शाखांमधून सभासदांसाठी पूर्वसुचनेनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. ४. बँकेची वेबसाईटwww.manndeshibank.com वर संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा - तोटा पत्रक प्रसिद्ध केला आहे.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

माण देशी महिला सहकारी बँकेने १७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सतरा वर्षातील माण देशीचा प्रवास अतिशय खडतर राहिला. सातारा जिल्ह्यातील म्हसवड सारख्या दुर्गम भागात १९९७ साली बँकेची सथापना झाली. स्थापनेपासून एक दोन वर्ष सोडले तर सतत दुष्काळाला तोंड द्यावे लागले. अशा विपरीत परिस्थितीत १ लाख ८५ हजारहून अधिक ग्राहकांना सेवा दिलेल्या या बँकेने प्रथमच सातारा जिल्ह्याबाहेर पुणेसारख्या शहरी भागात बँकेची शाखा २७ मे, २०१३ रोजी सुरु केली. माण देशीच्या ह्या प्रगतीत बऱ्याच लोकांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांची मी शतशः आभारी आहे.

माण देशी बँकेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश हा भाजीवाले, मेंढपाळ, टोपल्या विणणारे, चहा टपरी व दुध विक्रेते अशा एरवी बँकिंग सेवांना पारख्या असलेल्या लोकांना त्यांच्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्याचा आहे. म्हसवडपासून सुरु झालेल्या या बँकिंग सेवेची वाटचाल आज पुण्यासारख्या शहरातील धायरी उपनगरापर्यंत पोहचली आहे. ग्रामीण भागात बँकिंग सेवा देण्याच्या तुलनेत शहरी व निमशहरी भागातील बँकिंग क्षेत्रापुढील गरजा व आव्हानांची पूर्ण कल्पना ठेवूनच सदर शाखा सुरु केली आहे.

माण देशी बँकेचे वैशिष्ट्य हे की, खऱ्या खुऱ्या गोरगरीब महिलांना बँकेचे ग्राहक म्हणून सर्व प्रकारच्या बँकिंग सेवा उपलब्ध करुन देणे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बँकेने ग्राहकांच्या सोयीसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. बँकेद्वारे गरीब व गरजू महिलांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन दिले जाते तर फौंडेशनद्वारे व्यवसायीक प्रशिक्षण दिले जाते. लवकरच माण देशी संचलित व्यवसाय प्रशिक्षण शाळा व चेंबर ऑफ कॉमर्सची शाखा पुण्यात धायरी येथे सुरु होत आहे व महिला उद्योजिका घडविण्याचे कार्य होणार आहे.

बँकेकडे ४८ कोटी रुपयांहून अधिक ठेवी असून गरजू महिलांना बँकेने २८ कोटी रुपांयाहून अधिक कर्ज वाटप केले आहे. त्यातील जवळजवळ ८० टक्के कर्ज वाटपामध्ये छोट्या महिला व्यवसायीकांचा वाटा आहे.

माण देशी फौंडेशनने सुरु केलेल्या ''जनावरांच्या चारा छावणी '' मध्ये एप्रिल २०१२ पासुन जवळजवळ १४००० जनावरे जोपासली गेली व सुमारे ५००० लोकांना आश्रय मिळाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शेतकऱ्यांना भेटायला छावणीत आले आणि शेतकऱ्यांना हिम्मत दिली की ही छावणी शेवटची असेल.''भीषण दुष्काळात माणवासीयांच्या जनावरांचे होणारे हाल पाहता ''माण देशी फौंडेशनने पावसाचा थेंब न थेंब आडवण्याचा संकल्प घेऊन गाळ उपसा उपक्रम राबविला. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सिंमेट बंधारा बांधण्याची कामे हाती घेतली. तसेच ९ जुलै २०१३ रोजी आधुनिक फळे व भाजीपाला केंद्राचे नियोजन करुन नाशवंत मालाचे होणारे नुकसान टाळून शेतमाल टिकविल्याने शेतकऱ्यांना योग्य तो आर्थिक मोबदला मिळणार आहे.

सन २०20 पर्यंत १०,००,००० यशस्वी उद्योजिका तयार करण्याचे कार्य माण देशी फौंडेशनने हाती घेतले आहे. माण देशी बँकेच्या १४ शाखा तर माण देशी व्यवसाय शाळेचे २० शाखेत रुपांतर करणेचे माण देशीचे स्वप्न आहे. भविष्यात माण देशी म्युझियम काढणे ज्यामध्ये उत्तम दर्जाची चित्रे, शिल्पे, पुरातन वस्तु, माण देशीची खासियत असलेल्या वस्तूंचे प्रदर्शन या बाबतच्या माहितीचा संग्रह असेल व महिलांसाठी माण देशी बझार काढून त्यांना विक्रीसाठी दालन उभे करुन देणे तसेच माण देशी ट्रेनिंग इन्स्टिट्युट उभारणेचे ध्येय आहे.

माण देशी बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्या सर्व खातेदारांकडून आहे.

आपली स्नेहांकित
श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

# चालू वर्षातील घडामोडी

## माण देशी बँकेच्या धायरी, पुणे शाखेचे २७ मे रोजी उद्घाटन:-

सातारा जिल्ह्यातील सहकार क्षेत्रामध्ये अग्रगण्य असणाऱ्या व समाजातील तळागाळातील लोकांना बँकींग सेवा देणाऱ्या माण देशी महिला बँकेची ७ वी शाखा धायरी पुणे येथे सोमवार, २७ मे २०१३ रोजी सुरु झाली. शाखेचा उद्घाटन समारंभ मा. श्री. दिनेश ओऊळकर, अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, शेतकरी संघटनेचे नेते मा. श्री. शरद जोशी व डॉ. माधुरी खांबेटे(प्राचार्य,कमिन्स अभियांत्रिकी महिला विद्यालय पुणे) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

## १००% ग्रामीण महिलांचा बँकींग क्षेत्रात सहभाग- फायनान्यिशल इन्क्लुजन प्रोग्रॅम:-

माण देशीचा कल कायम ग्रामीण महिलांना त्यांच्या गरजेप्रमाणे सुविधा देण्याचा असल्यामुळे सन २०१२ मध्ये बँकेने व्यवसायिक ग्रामीण महिलांच्या आठवडे बाजारात मुलाखती घेवून त्यांची दररोज येणारी मिळकत व खर्चाचा आढावा घेतला. उद्देश असा की, महिलांचा ''कॅश फ्लो '' (आवकजावक) प्रमाणे बँकेच्या योजना तयार करणे. महिलांच्या आवक जावकाचे परिक्षण करुन माण देशी बँकेने आठवडा बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना जागेवरच कर्ज उपलब्ध करुन देण्याची सोय निर्माण केली आहे, जेणेकरुन १००% ग्रामीण महिलांना बँकेच्या योजनांचा लाभ घेता येणार आहे. ह्या योजनेमुळे महिलांना आता सावकाराकडे जाण्याची गरज भासणार नाही.

## माण देशी मार्केटींग महोत्सव :-

''माझी महिन्याची कमाई,तीन दिवसांत झाली'' हे उद्गार आहे मार्केटींग महोत्सवमधील देशी उद्योजिकांचे. माण देशी बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त सातारा येथे ७ मार्च ते १० मार्च पर्यंत मार्केटींग महोत्सवाचे आयोजन केले होते. शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, हा महोत्सवाच्या मागचा उद्देश. कायमस्वरुपी दुष्काळाचे चटके सहन करणाऱ्या माण देशी माणसांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे कार्य याद्वारे होत आहे. दुष्काळी भागातील लोकांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी हा महोत्सव निश्चितच फायदेशीर ठरला. माण देशी लोकांच्या गरजा लक्षात घेवून माण देशी महोत्सवाने प्रत्येक शेतकऱ्याच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्याचे काम केले आहे व त्यांना आर्थिक आधार दिला आहे. महोत्सवामध्ये १९० स्टॉल उभारले गेले होते. अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद, ७०,००० लोकांची महोत्सवास भेट व लाखोरुपयांची उलाढाल माण देशी मार्केटींग महोत्सवामध्ये झाली.

## माण देशी व्यवसाय शाळा व चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना :-

७०,००० पेक्षा जास्त महिलांनी प्रशिक्षण घेतलेल्या माण देशी व्यवसाय शाळेची नोव्हेंबर २०१२ ला लोणंद येथे सहावी शाखा स्थापन झाली. माणदेशी बँकेची सलग्न संस्था माण देशी फौंडेशन, लवकरच पुणे येथे व्यवसाय शाळेची ७ वी शाखा व माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्सची शाखा स्थापन करणार आहे. बँकेद्वारे गरीब व गरजू महिलांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन दिले जाते तर फौंडेशनद्वारे व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. पुणे येथे व्यवसाय प्रशिक्षण शाळा व चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेमुळे पुण्यातील मुली व महिलांना व्यवसायिक प्रशिक्षण व मार्गदर्शनाची सोय उपलब्ध होणार आहे तसेच महिला उद्योजिका घडविण्याचे कार्य होणार आहे.

## माण देशी उद्योजिका :-

''यशस्वी उद्योजिका महिला पाहिल्यानंतर काम, कष्ट आणि कर्तृत्व काही असेल तर ते इथेच आहे, ही जिद्द आणि उर्जा यांच्यामुळे मिळाली आणि तेच संचीत घेवून जाणार आहे.'' हे गौरवोद्गार अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी ''माण देशी उद्योजिका पुरस्कार २०१३'' वडूज येथील कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण प्रसंगी काढले. यावेळी कुंभारकाम, फोटोग्राफर, हॉटेलिंग, शेळीपालन, चुरमुरे व फुटाणे विकणाऱ्या तसेच केरसुण्या बनविणाऱ्या अशा नानाविविध व्यवसाय करणाऱ्या १६ माण देशी उद्योजिकांचा सन्मान करण्यात आला. ह्या महिलांनी **माण देशी बँकींग व व्यवसाय शाळेतून प्रशिक्षण** ह्या दुहेरी संगमाचा लाभ घेवून आपल्या व्यवसायामध्ये उल्लेखनीय प्रगती घडवून आणली. देशी उद्योजिकांच्या संघर्षाला सलाम करण्यासाठी ६००० लोकांनी गर्दी केली होती.

## माण देशी तरंग वाहिनी केंद्र :- (FM रेडीओ)

माण देशी तरंग वाहिनी मध्ये कार्यक्रमाची निर्मिती माणदेशी लोकांच्या मार्फत त्यांच्या कलागुणांच्या समावेशासह करण्यात येते. कार्यक्रमाचे प्रसारण सकाळी ०७.०० ते १०.००, दुपारी १२.३० ते २.३० महिला विशेष प्रसारण सभा आणि सायंकाळी ६.०० ते ९.०० दुसरी प्रसारण सभा अशा पद्धतीने दररोज ८ तास नियमित करण्यात येते. माण देशी श्रोत्यांचे आरोग्य हा रेडिओ कार्यक्रमाचा प्रमुख भाग समजून आरोग्यावर, आहारावर अधिक कार्यक्रमाची निर्मिती या वर्षात करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून माण देशी तरंग वाहिनी आणि 'रिच अक्षय' प्रकल्प, चेन्नई यांच्या संयुक्त प्रयत्नातून क्षयरोगावर आधारीत १२ आरोग्य कार्यक्रमाची निर्मीती करुन त्याचे प्रक्षेपण झाले. माण देशी तरंग वाहिनी जिल्हा क्षयरोग समितीवर सदस्य म्हणुन निवडली आहे. तसेच रेडिओद्वारे आर्थिक साक्षरता व शेतीविषयक प्रशिक्षणाचे कार्यक्रम वेळोवेळी राबविले जात आहेत. पुणे सातारा जिल्ह्याचे कवी संमेलन म्हसवड येथे चारा छावणीवर २१ एप्रिल २०१३ रोजी यशस्वी रित्या पार पडले. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून परिसरातील १० शाळा दत्तक घेऊन त्यांचे कार्यक्रम रेडिओवरुन प्रसारीत झाले. ''माण देशी लोकांचा रेडिओ कार्यक्रमात जास्तीत जास्त सहभाग'' या स्वव्यापाकडे माण देशी तरंग वाहिनी वाटचाल करित आहे.

## माण देशी क्रिडा संकुल:-

माण देशी चॅम्पियन (क्रिडा संकुल) मध्ये दररोज १२५ ते १४० ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंना अनुभवी क्रिडा कोच कडुन प्रशिक्षण दिले जाते. परदेशी क्रिडा प्रशिक्षकांकडून वेळोवेळी मार्गदर्शन दिले जाते. गरीब व गरजू खेळांडूना आर्थिक सहकार्य केले जाते व विद्यार्थ्यांना सकस व पौष्टीक आहार दिला जातो. सातारा जिल्हा ॲम्युचर असोशियन यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या स्पर्धेत माण देशी खेळाडूंनी सहभाग घेऊन प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकवला. यावर्षी उन्हाळी सुट्टी मध्ये मुलांसाठी १५ दिवसांच्या समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये क्रिडा नैपुण्य चाचण्यांची सराव शिबीरे व सहल शिबीर यांचा देखील समावेश होता. दरवर्षी मिनी मॅरेथॉन, प्राथमिक/माध्यमिक शाळा व इतर संघटनांच्या वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन तसेच व्यायाम, आरोग्य, व्यक्तिमत्व विकास या क्षेत्रामधील मान्यवर तज्ञांच्यामार्फत चर्चासत्राचे आयोजन केले जाते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्र :-

माण देशी फौंडेशन संस्थेस 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक' अतंर्गत अभ्यासक्रम सुरु करण्याची मान्यता जुलै २०११ मध्ये मिळाली. ''ज्ञानगंगा घरोघरी'' हे ब्रीद घेवून वंचितांसाठी शिक्षण देण्याचे कार्य या विद्यापीठाद्वारे केले जाते.

जून २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षामध्ये पुर्वतयारीसाठी ८१ विद्यार्थी/महिलांनी व बी.ए. भाग-१ पदवी अभ्यास क्रमासाठी ४२ विद्यार्थी/महिलांनी प्रवेश नोंदविला. या शैक्षणिक वर्षातील एकुण १२३ विद्यार्थ्यांचा निकाल १०० टक्के लागला. तदनंतर याच शैक्षणिक वर्षातील द्वितीय सत्रात पुर्वतयारी साठी ७८ विद्यार्थी/महिलांनी प्रवेश घेतला व त्याचा निकाल ९५ टक्के लागला असून शैक्षणिक वर्षात २०१३-२०१४ मध्ये जुलै पासुन पुर्वतयारी, बी.ए. भाग-१, बी.ए.भाग-२, बी.कॉम भाग -१ अशा शिक्षण क्रमास प्रवेश देणे सुरु आहे.

भविष्यात महिलांसाठी म्हणून डिप्लोमा इन ब्युटी पार्लर, डिप्लोमा इन फॅशन डिझाईनिंग तसेच डिप्लोमा इन बँकिंग मॅनेजमेंट, डिप्लोमा इन आय. टी. इन्फॉरमेशन सारखे इतर कोर्सेस सुरु करण्यात येणार आहेत.

## पुरस्कार :-

श्रीमती चेतना सिन्हा यांना महिलांमध्ये आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणलेबद्दल ''लोरियल पेरिस फेमिना'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माण देशीसारख्या दुष्काळी प्रदेशातील, पिडीत, उपेक्षित कष्टकरी महिलांसाठी ग्रामीण महिला बँक, व्यवसाय शाळा, फिरती व्यवसाय शाळा, रेडिओ स्टेशन, ग्रामीण मुला-मुलींसाठी माण देशी चॅम्पियन क्रिडा संकुल सुरु करुन उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल श्रीमती चेतना सिन्हा यांना माण देश फौंडेशन, पुणे यांच्यातर्फे ''सावित्रीबाई फुले पुरस्कार'' देवून गौरविण्यात आले. तसेच सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर, निर्मला निकेतन कॉलेज,मुंबई, श्रीमती हिराबेन नानावती इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च तर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांना गौरवचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

## आर्थिक उलाढाल :-

आज माण देशी महिलांचा प्रचंड विश्वास ही माण देशी महिला सहकारी बँकेची खरी ठेव आहे. आज २०१२-१३ या आर्थिक वर्षात बँकेच्या या महिलांनी ४८ कोटी १ लाख १९ हजार रुपयांच्या ठेवी माण देशी बँकेत ठेवल्या आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत ठेवीत २०.०२% नी वाढ झाली आहे. २८ कोटी ५३ लाख ६० हजार रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्ज वाटपात ८.०२% नी वाढ झाली आहे. एनपीए चे प्रमाण केवळ १.५९% या वर्षीचा ढोबळ नफा ६७ लाख ७९ हजार रुपये झाला आहे. गेल्या वर्षाच्या नफ्याच्या तुलनेत ८.२९% ने वाढ झाली आहे. बँकेचे भागभांडवल ३ कोटी ०८ लाख ८० हजार आहे. बँकेचे खेळते भांडवल ५३ कोटी ७० लाख ५३ हजार आहे.

## माण देशी इंटरनशिप प्रोग्रॅम :-

आतापर्यंत येल युनिव्हर्सिटी, पोर्टलॅण्ड युनिव्हर्सिटी, हार्वड साईस युनिव्हर्सिटी, कोलंबिया, मिचीगन, बर्कले युनिव्हर्सिटी, डोएच बँक अशा विविध युनिव्हर्सिटीद्वारे १०० विद्यार्थ्यांनी येवून माण देशीच्या उपक्रमांवर अभ्यास केलेला आहे. २०१२-१३ मध्ये एस.पी.जैन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च मुंबई, बेम मॅनजमेंट स्कूल व आयसीएन बिझनेस स्कुल फ्रान्स तसेच येल युनिव्हर्सिटी अशा विविध संस्थामधून ६ देशी तथा परदेशी विद्यार्थ्यांनी माण देशीस भेट देवून कार्याचा अभ्यास केला.

# १६ वा वार्षिक अहवाल सन २०१२-१३

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ७ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ३०८८०९५०/- एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. ३२२७४२५ इतकी वाढ झालेली असून ही वाढ ११.६७ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण २५७० नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ७३७ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या १४०५३ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. ५६४९८४५.६६ होती अहवाल वर्षात त्यात रु. २८६१४४६.४५ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी, राखीव निधीची रक्कम रु. ८५११२९२.११ इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण ५०.६५ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१२ च्या ठेवी रु. ४०००३२१३८.८९ लाखावरुन मार्च २०१३ अखेर रु. ४८०११८६६८.८९ एवढ्या झाल्या आहेत ही वाढ रु. ८००८६५३० इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण २०.०२% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु.२६४१८२६३२.१७ इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.२११७६९४६.३५ एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणुन त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ६०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१२-२०१३ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९१.५०% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना सुद्धा ८८.७५% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ३.८३% इतके आहे व वसुली ९६.१७% झाली आहे. व NPA १.५९% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

**नफा वाटणी :-** या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| चालू सालचा नफा रु. | सरासरी प्रमाण | ३३९२३१८.०४ |
|---|---|---|
| राखीव निधी | ५०% | १६८७३१८.०४ |
| इमारत निधी | ३२% | १०९१०००.०० |
| शैक्षणिक निधी तरतुद | ५% | १७५०००.०० |
| तांत्रिक विकास निधी | १०% | ३३९०००.०० |
| निवडणुक निधी | ३% | १०००००.०० |
| एकूण | १०० % | ३३९२३१८.०४ |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २४% २) ओ.बी.सी. - २१% ३) एन्. टी. २९% ४) ओपन - २६%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१३ या वर्षात रु. १७८७३५४६२.०० इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक १०४०२७४१३.०० व इतर बँकेमध्ये ७४७०८०४९.०० गुंतवणूक केलेली आहे.

## सोनेतारण कर्ज :-

बँकेने दि. ११/८/१९९७ पासून सोनेतारण कर्ज योजना बँकेच्या सर्व शाखांमध्ये सुरु केलेली असून सदर योजनेतून एकूण ३४२ लाख ३४ हजार रुपये इतके कर्जवाटप करणेत आले आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१३ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण मे. जाधव तानाजीराव आणि कं. चार्टर्ड अकौटंटस् ,कराड यांनी केले असुन त्यांनी बँकेस बहुमोल सुचना व मार्गदर्शन केले आहे.

## प्रशिक्षण कार्यक्रम :-

| प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|
| १. कॅशिअर प्रशिक्षण | माण देशी बँकेचे कॅशिअर | बँकींग क्षेत्रातील तज्ञ अधिकारी |
| २. के.वाय.सी, कर्ज नियमावली, एन.पी.ए., संचालकांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये | सर्व माण देशी बँक संचालक व कर्मचारी वर्ग | रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी |
| ३. बँकींग सॉफ्टवेअर आणि कर्ज प्रशिक्षण | शाखाधिकारी व कर्ज विभाग अधिकारी | माण देशी बँकेचे सल्लागार व कर्ज वसुली अधिकारी, इ.डी.पी.पर्सन |
| ४. वसुली प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम | विशेष वसुली अधिकारी,शाखाधिकारी | सहकार प्रशिक्षण व संशोधन कक्ष यशदा पुणे |
| ५. कॅश ट्रान्झकशन रिपोर्ट प्रशिक्षण | हिशोब तपासणीस आणि शाखाधिकारी | सातारा जिल्हा नागरी सहकारी बँकर्स् असोसिएशन |
| ६. एफ.आय.यु-आय.एन.डी. यांचेकडे पाठवावयाची रिटर्न्स बाबत कार्यशाळा | मुख्य लेखपाल आणि शाखाधिकारी | मा.श्री. आनंद गोखले डेप्युटी डायरेक्टर, एफ.आय.यु-आय.एन.डी. |
| ७. गट कर्ज वाटपामध्ये वित्तीय सल्लागार व कर्ज अधिकारी यांची क्षमता वाढवण्यासाठी | बँकेचे सर्व वित्तीय सल्लागार व कर्ज अधिकारी सल्लागार | माण देशी बँकेचे सल्लागार |
| ८.गट कर्ज वाटप कार्या संबंधी घ्यावयाची दक्षता, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या | वित्तिय सल्लागार व शाखा म्हसवड पिग्मी एजंट | माण देशी बँकेचे सल्लागार |
| ९. क्रेडिट मूल्यमापन, कर्ज परतफेड आणि कर्ज व्यवस्थापन | शाखाधिकारी ,वसुली अधिकारी, वित्तिय सल्लागार | माण देशी बँकेचे सल्लागार |
| १०. कोअर बँकींग प्रणाली आवश्यकता व गरज | शाखाधिकारी शाखा सातारा, इ.डी.पी. पर्सन | सातारा जिल्हा नागरी सहकारी बँकर्स असोसिएशन |

अभिनंदन- माण तालुक्यातील मोही गावच्या कु. ललिता बाबर यांनी २०१२-१३ पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनद्वारा आयोजित दहा किलोमीटर धावण्याच्या शर्यतीत महिला गटात विजेतेपद संपादन केले. त्यांना मिळालेल्या यशाबद्दल माण देशी परिवारातर्फे हार्दीक अभिनंदन!

श्रद्धांजली -

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक आणि साधना साप्ताहिकाचे संपादक व पुरोगामी नेतृत्त्वाचे व्यक्तिमत्व असलेल्या डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना माण देशी बँकेकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धाजंली.

# लेखापरीक्षण अहवाल

(बॅकिंग रेग्युलेशन ॲक्ट कलम ३०, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१
(५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

आम्ही *माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड* या बँकेच्या सोबत जोडलेल्या दिनांक ३१।०३।२०१३ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचा नफा / तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केले आहे. ही दोन्ही आर्थिक पत्रके बनविण्याची जबाबदारी त्या संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकांवर मत नोंदविण्याचे आहे.

आम्ही आमचे लेखापरिक्षण भारतात सर्वमान्य असलेल्या ऑडीटिंग स्टॅण्डर्डस्‌ना अनुसरुन केले आहे. त्या स्टॅण्डर्डस् नुसार आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की जेणेकरुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली पाहिजे. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होतो. तसेच व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटिंग तत्वांची तपासणी करणे. व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजांची तपासणी करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश लेखापरिक्षणामध्ये होतो. आमचा विश्वास असा आहे की, आमचे लेखापरिक्षण आम्हाला मते बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देते.

आम्ही अहवाल करतो की,

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल, त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी हिशोबाची पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहे.

४) आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहीती देतात. तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्ट आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील भाग 'अ', 'ब' आणि 'क' मधील मुद्द्यानां अनुसरुन-

अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१।०३।२०१३ ची बँकेच्या आर्थिक परिस्थीतीची आणि

ब) नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थितीची.

५) सहकारी वर्ष २०१२-२०१३ करीता संस्थेस वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

स्थळ : सातारा
दिनांक : १७.०६.२०१३

एस. आर. चौरसिया आणि कं.
चार्टर्ड अकौटंट करीता

# बँकेची वैशिष्ट्ये

१. व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
२. स्थानिक नेतृत्व आणि व्यवस्थापन
३. व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.
४. ग्रामीण गावातील सभासदांना एजंटची सोय
५. रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
६. जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
७. वीजबीले स्विकारण्याची सोय
८. महिलांसाठी UTI पेन्शन योजना
९. आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.

## ठेवीचे व्याजदर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव ४% | २७५ दिवस ते २ वर्ष १०% |
| १५ दिवस ते ४५ दिवस ६.५% | २ वर्ष ते ५ वर्ष ९.७५% |
| ४६ दिवस ते ९० दिवस ७% | दामदिडपट ठेव-४ वर्षे २ महिने १६ दिवस |
| ९१ दिवस ते १८० दिवस ८% | दामदुप्पट ठेव -७ वर्षे २ महिने ११ दिवस |
| १८१ दिवस ते २७४ दिवस ९% | ५ वर्षाच्या पुढे - ९.७५% |

जेष्ठ नागरिक / पतसंस्था ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९ शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७० शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२ शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६३०३८८

**शाखा म्हसवड येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.**

## ✲ बँकर्स ✲

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
एच.एस.बी.सी.मुंबई
एच.डी.एफ.सी.बँक शाखा पुणे
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध,दहिवडी
आ.डी.बी.आय म्हसवड, राणंद,लोणंद,सोलापूर, कळंबोली
आय.सी.आय.सी.आय.म्हसवड
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
एस. बी.आय. वडुज, सातारा, ॲक्सीस बँक सातारा

### अंतर्गत लेखापरिक्षक

मे. जाधव तानाजीराव आणि कंपनी
श्री. जाधव तानाजीराव बाबूराव
चार्टर्ड अकौंटंटस् अंतर्गत लेखा परिक्षक,कराड

### सरकारी लेखापरिक्षक

एस. आर. चौरसिया ॲन्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंटस्, सातारा

### कायदेशीर सल्लागार

ॲड. काझी एन. एच. (म्हसवड)
ॲड. माने एस. एम.(म्हसवड)

## परिशिष्ठ अ

| | |
|---|---|
| बँकेचे नांव | :- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९ |
| नोंदणी तारीख व नोंदणी क्रमांक | :- एस. ए. टी./ एम.ए.एन./बी.एन.के./ओ/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६ |
| रिझर्व बँक परवाना नंबर तारीख | :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७ |
| कार्यक्षेत्र | :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हा |

| तपशील ३१/३/२०१३ | | | रक्कम |
|---|---|---|---|
| मुख्य कार्यालय | म्हसवड | | |
| सभासद | I) अ वर्ग | | १४०५३ |
| | II) ब वर्ग | | ३५२१ |
| वसुल भागभांडवल | | | ३०८८०९५०.०० |
| एकूण राखीव व इतर निधी | | | ८०५२७६२.३२ |
| ठेवी | I) बचत ठेव | | १०९२०६२९४.५९ |
| | II) चालू ठेव | | ११२९३६३६.९९ |
| | III) मुदत व इतर ठेवी | | ३५९६१८७३७.३१ |
| दिलेली कर्ज | I) सुरक्षीत | | २७१२३८५६६.५२ |
| | II) असुरक्षीत | | १४१२१०१२.०० |
| | एकूण टक्केवारी अग्रक्रम क्षेत्रासाठी | | ९१.५०% |
| | एकूण टक्केवारी दुर्बल घटकासाठी दिलेली कर्ज | | ८८.७५% |
| गुंतवणूक | दि. सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि.सातारा, स्टेट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय व इतर बँक | | |
| | मुदत ठेव | | ७४७००५४९.०० |
| | सरकारी कर्ज रोखे | | १०४०२७४१३.०० |
| | DCC शेअर्स | | ५००.०० |
| थकबाकी | | | ३.८३% |
| NPA | | | १.५९% |
| ऑडीटवर्ग | | | 'अ' |
| वार्षिक नफा | | | ३३९२३१८.०४ |
| एकूण कर्मचारी | अधिकारी - | १८ | |
| | लिपीक - | २१ | |
| | शिपाई - | ४ | |
| शाखा | शाखा - | ६ | |
| खेळते भांडवल | | | ५३७०५३४९४.२० |

# रिझर्व्ह बँक परिपत्रकानुसार दर्शविणेची माहिती

| अ. नं. | तपशिल | ३१/०३/१२ | ३१/०३/१३ |
|---|---|---|---|
| १ | स्वनिधी परिपूर्णता प्रमाणक (सी. आर. ए. आर.) | १७.५४% | १८.५४% |
| २ | ढोबळ एन. पी. ए. कर्ज रक्कम | ९८.१७ | १०१.०४ |
| ३ | ढोबळ एन. पी. ए. कर्ज एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | ३.७२% | ३.५४% |
| ४ | निव्वळ एन. पी. ए. कर्ज रक्कम | ५९.५१ | ४४.५३ |
| ५ | निव्वळ एन. पी. ए. कर्जाशी शेकडा प्रमाण | २.२९% | १.५९% |
| ६ | १) एन. पी. ए. तरतूद | ३८.६६ | ५६.५१ |
| | २) नियमीत कर्जाबाबत तरतूद | ८.६० | ८.६० |
| ७ | सरकारी रोखे गुंतवणूकीची रक्कम | ८२६.४९ | १०४०.२७ |
| ८ | निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.७९% | ०.८३% |
| ९ | इतर उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.११% | ०.१०% |
| १० | व्याज उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १३.२६% | १४.३२% |
| ११ | व्यवस्थापकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | २.५६% | २.७६% |
| १२ | १) प्रती सेवक व्यवसाय | १६६.०५ | १७८.०२ |
| | २) प्रती सेवक नफा | ०.७८ | ०.७९ |
| १३ | सरकारी रोखे गुंतवणूकीचे एन. डी. टी. एल. शी प्रमाण | २७.९३% | ३०.९४% |
| १४ | सरासरी येणे कर्जाचे सरासरी ठेवीशी शेकडा प्रमाण | ७६.९९% | ७२.२५% |
| १५ | संचालकांकडील येणे कर्जाचे एकुण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण | --- | --- |
| १६ | ठेव विमा हप्ता | ३.२९ | ३.८७ |
| १७ | अतिरिक्त परिशिष्ट(गुंतवणूक)<br>अ) नॉन एस. एल. आर. गुंतवणलकीचा तपशील<br>१) राष्ट्रीयकृत बँका<br>२) अन्य | <br>२२९.७१<br>२२४.००<br>५.७१ | <br>५७०.७९<br>५६५.०३<br>५.७६ |

## 'एन' नमुना

## ताळेबंद पत्रक

| रक्कम ३१/०३/२०१२ | भांडवल व देणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ५००००००००.०० | अधिकृत भागभांडवल २५ चे ३०७१०० व १०० चे ६२३२२५ भाग या प्रमाणे भाग | | ७००००००००.०० |
| | वसुल भागभांडवल | | |
| २७६५३५२५.०० | १) व्यक्तिगत | ३०८८०९५०.०० | ३०८८०९५०.०० |
| १०३७५२३८.०९ | इतर निधी | | |
| | १) राखीव निधी | ३७६७५८३.४२ | |
| | २) इमारत निधी | ४२६९४९३.८९ | |
| | ३) लाभांश स. निधी | १५६८५.०० | |
| | ४) संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | ५६५०५१४.३८ | |
| | ५) गुंतवणूक चढउतार निधी | ४५८५००३०.०० | |
| | ६) स्टँडर्ड असेट तरतूद | ८५९५००.०० | १५०२१३०६.६९ |
| ४०००३२१३८.८९ | ठेवी | | |
| | मुदत ठेवी | | |
| २२७७८२०३६.५३ | व्यक्तीगत ठेवी | | |
| | १) व्यक्तिगत मुदत ठेवी | १३४१११४०.०० | |
| | २) व्यक्तिगत दामदुप्पट ठेवी | ३३९८९३२४.०० | |
| | ३) व्यक्तिगत दामदिडपट ठेवी | ५५२५२०७.०० | |
| | ४) व्यक्तिगत दामतिप्पट ठेवी | २८६३१०२८.०० | |
| | ५) व्यक्तिगत दामचौप्पट ठेवी | ३३९७११.०० | |
| | ६) रिकरींग ठेव | १००५३७००.०० | |
| | ७) पुनर्गुंतवणूक ठेव | ८३९६६७४.०० | |
| | ८) माणदेशी बचत ठेव | २५३५३१४०.०० | |
| | ९) महिला समृद्धी ठेव | २३७३४९८.०० | |
| | १०) महिला स्फुर्ती | ९५४०९.६० | |
| | ११) महिला साप्ताहिक ठेव | १०८९८.०० | |
| | १२) धनवर्धीनी ठेव | ०.०० | |
| | १३) माणदेशी दशपुर्ती ठेव | ३३७७६९५.०० | |
| | १४) सावित्रीबाई फुले बचत ठेव | ५१८३.७१ | |
| | १५) सिता बचत ठेव | ५४६५०.०० | |
| | १६) सामाजीक सुरक्षा ठेवी | ३८०६३८.०० | |

# दि. ३१।३।२०१२ अखेर

| रक्कम ३१/०३/२०१२ | जिंदगी व येणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| २१७३७३८३.०० | हातावरील शिल्लक | ३२१६९८८४.०३ | ३२१६९८८४.०३ |
| २१७५२२८४.९८ | **बँकेतील शिल्लक** | | |
| | एम.एस.सी. आणि जिल्हा मध्य. बँक | | |
| | १) एम.एस.सी.बँक चालु ठेव खाते मुंबई | ३१००१.९० | |
| | २) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-म्हसवड | ७६१७३७९.८५ | |
| | ३) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-वडुज | १०८११७.२० | |
| | ४) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-गोंदावले | २३१५५४४.६१ | |
| | ५) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-दहिवडी | २२२३०६३.५० | |
| | ६) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पिलीव | १४८९८०.०० | |
| | ७) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-लोंणद | २०७६८३५.०० | |
| | ८) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-मलवडी | ३०००.०० | |
| | ९) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा | १९६५०२१.३९ | |
| | १०) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पुसेगांव | ६९६.०० | |
| | ११) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पुसेसावळी | १३६०.०० | |
| | १२) जि.म.बँक चालु ठेव खाते शाखा-पनवेल | ५८८७.२३ | |
| | राष्ट्रीयकृत बँका चालु ठेव | | |
| | १) बँक ऑफ इंडिया चालु ठेव खाते शाखा-बुध | ५९९०८१.०७ | |
| | २) स्टेट बँक ऑफ इंडिया चालु ठेव खाते शाखा-वडुज | ५९९७४६.३३ | |
| | ३) बँक ऑफ महाराष्ट्र चालु ठेव खाते शाखा-म्हसवड | १९९०७८.९९ | |
| | ४) बँक ऑफ महाराष्ट्र चालु ठेव खाते शाखा-गोंदावले | ४३०१६३.०० | |
| | ५) बँक ऑफ बडोदा चालु ठेव खाते शाखा-दहिवडी | १४३९८२.३२ | |
| | ६) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-म्हसवड | ५२३८८८१.८६ | |
| | ७) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-रांणद | ६४५.०० | |
| | ८) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-सोलापूर | २१६४०९.०० | |
| | ९)आय.डी.बी.आय.बँक चालु ठेव खाते शाखा-कळंबोली | १२९०७८३.९८ | |
| | १०) आय.डी.बी.आय बँक चालु ठेव खाते शाखा-लोणंद | १०१८६४.५७ | |
| | ११) स्टेट बँक ऑफ इंडिया चालु ठेव शाखा-सातारा | ९९००.०० | |
| | राष्ट्रीयकृत बँका सेव्हिंग्ज ठेव | | |
| | १) आय.डी.बी.आय बँक सेव्हिंग्ज ठेव शाखा-रांणद | १७७१.०० | |
| | २) बँक ऑफ बडोदा सेव्हिंग्ज ठेव खाते शाखा-दहिवडी | ९०१४८.०० | |
| | व्यापारी बँका | | |
| | १) आय.सी.आय.बँक चालु ठेव खाते शाखा-म्हसवड | १८८६.९९ | |
| | २) एच.डी.एफ.सी. बँक चालु ठेव खाते शाखा-पुणे | ११८१०.७० | |
| | ३) एच.एस.बी.सी.बँक चालु ठेव खाते शाखा-मुंबई | २९३९६.८० | |
| | ४) ॲक्सेस बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा | १३१३८२.०९ | |
| | ५) ॲक्सेस बँक चालु ठेव खाते शाखा-सातारा | ८१३५०९.७७ | २६४०७३२८.१५ |

## 'एन' नमुना

## ताळेबंद पत्रक

| रक्कम ३१/०३/२०१२ | भांडवल व देणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ८३६९११५५.०० | संस्था ठेवी | | |
| | १) संस्था मुदत ठेवी | ९२३८०३५९.०० | |
| | २) संस्था दामदिडपट ठेवी | ४७७४२८.०० | |
| ८७२२३८७९.४ | सेव्हिंग्ज ठेव | | |
| | १) व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव | ९४९४८८२०.५९ | |
| | २) संस्था सेव्हिंग्ज ठेव | १४२५७४७४.०० | |
| १३३५०६७.९६ | चालु ठेव | | |
| | १) व्यक्तीगत चालु ठेव | ८८३२१२४.९९ | |
| | २) संस्था चालु ठेव | २४६१५१२.०० | |
| ०.०० | मुदत संपलेल्या ठेवी | | |
| | मुदत संपलेल्या मुदत ठेवी | १०४६४६९८.०० | |
| | मुदत संपलेल्या पुनर्गुतवणूक ठेवी | ३५९८३५६.०० | ४८०११८६६८.८९ |
| १३११५०११.०० | ओ.बी.सी. | १७९९७०८.०० | १७९९७०८.०० |
| ८३१.७५ | बाहेरील कर्ज(जि.मध्य.सह.बँक ओ.डी.) | ०.०० | ०.०० |
| ७६४४६६८.८२ | मुदतठेवीवरील देणे व्याज | ६०६८१२७.७३ | ६०६८१२७.७३ |
| ६०४०६३९.०० | इतर देणी | | |
| | १) ऑडिट फी देणे | २००२१५.०० | |
| | २) शिक्षण निधी देणे | १००००.०० | |
| | ३) थकव्याज एन.पी.ए. | ४९३२४०१.०० | |
| | ४) टी.डी. एस. देणे | १४७०२.०० | |
| | ५) शेती कर्ज देणे | २०८००००.०० | |
| | ६) व्यवसाय कर देणे | १००५०.०० | |
| | ७) आय कर देणे | १७५०००.०० | |
| | ८) सरचार्ज देणे | १२४९०.०० | |
| | ९) अनामत देणे | ११३२७६४.८५ | |
| | १०) लाईट बिल देणे | १६९०१.०० | ८५८४५२३.८५ |
| ३१३८४८८.६० | नफा/ तोटा खाते | ३३९२३१८.०४ | ३३९२३१८.०४ |

# दि. ३१।३।२०१३ अखेर

| रक्कम ३१/०३/२०१२ | जिंदगी व येणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| १२८५८२६५५.०० | **गुंतवणूक** | | |
| ८२६४९१७८.०० | सरकारी रोखे | | |
| | १) केंद्र सरकारी रोखे (Central Government Sec.) | ८७४४१७१२.०० | |
| | २) राज्य सरकारी रोखे (State Government Sec.) | १६५८५७०१.०० | १०४०२७४१३.०० |
| ४५९३२९७७.०० | **बँकेतील मुदत ठेवी** | | |
| | एम.एस.सी. आणि जिल्हा मध्य. बँक | १८१७८९१७.०० | |
| | राष्ट्रीयकृत बँका | | |
| | १) स्टेट बँक ऑफ इंडिया मुदत ठेव खाते शाखा-वडुज | २१५००००.०० | |
| | २) आय.डी.बी.आय बँक मुदत ठेव खाते शाखा-रांणद | ३५००३०००.०० | |
| | शेडुल्ड बँका | | |
| | १) कराड अर्बन बँक मुदत ठेव शाखा-वडुज | २५६३२.०० | ७४७०७५४९.०० |
| ५०० | जि.मध्य. सह बँक शेअर्स | ५०० | ५०० |
| | **कर्जे** | | |
| १०६९२१८२.०० | अल्प मुदत कर्जे | | |
| | १) कॅश क्रेडीट कर्जे | ११२३६८९९.०० | |
| ७८८७०७३१.३५ | मध्यम मुदत कर्जे | | |
| | १) हायपरचेस कर्ज | २३५३५४३३.०० | |
| | २) सामान्य कर्ज | २३७७८६६४.२८ | |
| | ३) गृहउपयोगी कर्ज | ३५७१७१५.०० | |
| | ४) महिला उत्कर्ष कर्ज | ६४२२०.०० | |
| | ५) मध्यम मुदत कर्ज | १७५२९२९७.०० | |
| | ६) रिफायनान्स कर्ज | ७७२९४२.७० | |
| | ७) माणदेशी नॅनो कर्ज | ७८१०६.०० | |
| | ८) माणदेशी प्रगती कर्ज | १२३२३९४८.०० | |
| ८२८१४३२०.०० | ठेव तारण कर्जे | | |
| | १) मुदत ठेव तारण कर्ज | २०३१७३९०.०० | |
| | २) दामदिडपट तारण कर्ज | ७७०९७५.०० | |
| | ३) दामदुप्पट तारण कर्ज | ५०५५६७२.०० | |
| | ४) रिकरींग ठेव तारण कर्ज | ८५२८५८.०० | |
| | ५) माणदेशी बचत ठेव तारण कर्ज | ११३१५५१८.०० | |
| | ६) महिला समृद्धी ठेव तारण कर्ज | १०७७४५.०० | |
| | ७) पुनर्गुंतवणूक ठेव तारण कर्ज | ९५६१३१.०० | |
| | ८) धनवर्धीनी ठेव तारण कर्ज | १०७६९९८.०० | |
| | ९) दामचौप्पट ठेव तारण कर्ज | ३६०९३.०० | |
| | १०) दामतिप्पट ठेव तारण कर्ज | १२५९२९६.०० | |
| | ११) व्यक्ती ओ. डी. | २१५९२४३.०० | |
| | १२) राष्ट्रीय बचत पत्र तारण कर्ज | १०९३२९.०० | |
| | १३) संस्था ओ.डी. | १५५५१२२३.७२ | |
| | १४) संस्था ठेव तारण कर्ज | ५२६३३.०० | |
| | १५) सोनेतारण कर्ज | ३४२३३९५३.०० | |

## 'एन' नमुना

## ताळेबंद पत्रक

| रक्कम ३१/०३/२०१२ | भांडवल व देणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| | | | |
| ४५६२००५८१.१५ | एकूण | ५४५८६५६०३.२० | ५४५८६५६०३.२० |

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

**सरकारी लेखापरिक्षक**
एस. आर. चौरसिया ॲन्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंटस् सातारा

# दि. ३१।३।२०१३ अखेर

| रक्कम ३१/०३/२०१२ | जिंदगी व येणी | रक्कम ३१।३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ९१८०५३९८.८२ | **दिर्घ मुदत कर्ज** | | |
| | १) हौसिंग कर्ज | ९३०२१८२.०० | |
| | २) दिर्घ मुदत कर्ज | ९९४९५११३.८२ | २८५३५९५७८.५२ |
| १०२४८२२७.०० | **येणे व्याज** | | |
| | १) येणे व्याज एन.पी.ए. | ४९३२४०१.०० | |
| | २) येणे व्याज (कर्ज वरील) | ५२७४०२४.०० | |
| | ३) येणे व्याज (बँक मुदत ठेवीवरील) | २७४३७८.०० | |
| | ४) येणे व्याज (सरकारी रोख्यावरील) | २२५४८०७.०० | १२७३५६१०.०० |
| १३१५०५१.०० | **ओ.बी.आर.** | १७९९७०८.०० | १७९९७०८.०० |
| २२९६३५.०० | **शाखा मिळवणी** | ६६०२४.५० | ६६०२४.५० |
| ४९६५६२७.०० | **डेडस्टॉक** | | |
| | १) फर्निचर डेडस्टॉक | १५१२९१३.३० | |
| | २) इलेक्ट्रीक डेडस्टॉक | १२५८७४६.७२ | |
| | ३) सजावट डेडस्टॉक | २७९९५.०० | |
| | ४) कॉम्प्युटर डेडस्टॉक | १७९२००६.६८ | |
| | ५) लॉकर डेडस्टॉक | ५९०६७६.०५ | |
| | ६) मोटारसायकल डेडस्टॉक | १५१३५४.२५ | ५३३३६९२.०० |
| ३१८७०८६.०० | **डिपॉझिट** | | |
| | १) टेलिफोन डिपॉझिट | ८९८४.०० | |
| | २) इलेक्ट्रीक डिपॉझिट | १९५३५.०० | |
| | ३) नळ कनेक्शन डिपॉझिट | ७५०.०० | |
| | ४) शिल्लक स्टेशनरी | ३३४१२७.०० | |
| | ५) निवडणुक अनामत | ६४९२०.०० | |
| | ६) एम.एस.इ.बी.बिल कलेक्शन(डिपॉझिट) | ५५००००.०० | |
| | ७) आयकर येणे | ७८०००.०० | |
| | ८) ॲडव्हान्स | १२२०००.०० | |
| | ९) शासन येणे | २०८००००.०० | ३२५८३१६.०० |
| ४५६२००५८१.१५ | एकूण | ५४५८६५६०३.२० | ५४५८६५६०३.२० |

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सौ. गीता ग. रसाळ**
उपाध्यक्षा

**सौ. चेतना वि. सिन्हा**
अध्यक्षा

व सर्व संचालक मंडळ

## 'एन' नमुना

## नफा-तोटा पत्रक

| रक्कम ३१/०३/२०१२ | खर्च | रक्कम ३१।०३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| २९९८६७९६.९१ | १) व्याज दिले | | |
| | १) व्याज दिले ठेवीवरील | ३७१६४५७१.६५ | |
| | २) व्याज दिले कर्जावरील | ०.०० | |
| | ३) व्याज दिले बँक ओ.डी. वरील | ८९२८१.०० | ३७२५३८५२.६५ |
| ४७५२०५२.०० | २) पगार खर्च | | |
| | कर्मचारी पगार | ५६५८९९८.०० | |
| | कर्मचारी भत्ता | २८१००.०० | |
| | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | २७३५२४.०० | |
| | भविष्य निर्वाह निधी प्रशासकीय खर्च | ३६९९९.०० | |
| | कर्मचारी प्रवास भत्ता | ११०५५.०० | |
| | हंगामी सेवक पगार | २९९२४९.०० | |
| | कर्मचारी बोनस | ४८५१४१.०० | |
| | कर्मचारी विमा | १८५७०.०० | |
| | कर्मचारी प्रशिक्षण | १२९०७४.०० | ६९४०७१०.०० |
| ९०२४६.०० | ३) संचालक मिंटींग खर्च | | |
| | संचालक मिंटींग भत्ता | ९७८००.०० | |
| | संचालक प्रवास भत्ता | ६९५६.०० | १०४७५६.०० |
| १३८२९३५.०० | ४) कर भाडे विमा | | |
| | ऑफिस भाडे | ६१३२००.०० | |
| | ऑफिस घरपट्टी व पाणीपट्टी | ५४४६०.०० | |
| | विमा खर्च | ५०७१५४.०० | |
| | लाईट बिल खर्च | २९६०५१.०० | |
| | वाहन कर | १३१००.०० | |
| | इलेक्ट्रीक खर्च | ४११०६.०० | १५२५०७१.०० |
| १००००.०० | ५) कायदेशीर खर्च | | |
| | शिक्षण निधी खर्च | १००००.०० | १००००.०० |
| २९४५६१.०० | ६) टेलिफोन व पोस्टेज खर्च | | |
| | पोस्टेज खर्च | १७०१४.०० | |
| | टेलिफोन खर्च | ३२१०१७.०० | ३३८०३१.०० |
| १६९७८७.०० | ७) ऑडीट फी | | |
| | ऑडीट फि तरतूद | २०००००.०० | |
| | ऑडीट खर्च | १००७९.०० | २१००७९.०० |
| १३९८१३१.०० | ८) डेडस्टॉक दुरुस्ती व घसारा | | |
| | घसारा खर्च | १२०५८४२.५० | |
| | डेडस्टॉक दुरुस्ती खर्च | ५६४८८.०० | |
| | कॉम्प्युटर दुरुस्ती खर्च | १३२७७८.०० | |
| | हार्डवेअर आणि सॉप्टवेअर खर्च | ३२०४७३.०० | १७१५५८१.५० |

## दि. १।४।२०१२ ते ३१।३।२०१३ अखेर

| रक्कम ३१/०३/२०१२ | उत्पन्न | रक्कम ३१।०३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ४६३४९७९०.८६ | १) व्याज आले | | |
| | १) व्याज आले कर्जावरील | ४८७८३३७७.१९ | |
| | २) व्याज आले सरकारी रोख्यावरील | ६९२९६९५.९४ | |
| | ३) व्याज आले गुंतवणुकीवरील | २७९६४७३.०० | ५८५०९५४६.१३ |
| १९६०१३.०० | २) कमिशन | | |
| | कमिशन | १०३४९५.४९ | १०३४९५.४९ |
| १६४६५३.७० | ३) इतर उत्पन्न | | |
| | लॉकर भाडे | १०५००.०० | |
| | लांभाश | ६५.०० | |
| | इतर उत्पन्न | १८१७६०.०० | |
| | सर्व्हिस चार्जेस | ४३५५.०० | |
| | चेक रिटर्न चार्जेस | ७७५०.०० | |
| | सरकारी रोख्यावरील उत्पन्न | १९७२५.०० | |
| | स्टेशनरी उत्पन्न | १२२०४.०० | २३६३५९.०० |

## 'एन' नमुना

## नफा-तोटा पत्रक

| रक्कम ३१/०३/२०१२ | खर्च | रक्कम ३१।०३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ३३१०३५.०० | ९) प्रिंटीग स्टेशनरी खर्च | | |
| | स्टेशनरी खर्च | ३२६३६३.६६ | |
| | कॉम्प्युटर स्टेशनरी खर्च | ९४९५.०० | |
| | चेक बुक चार्जेस खर्च | १२०.०० | ३३५९७८.६६ |
| ३०८३९९३.०५ | १०) इतर खर्च | | |
| | पिग्मी कमिशन | २४७३३९२.२६ | |
| | मिटींग खर्च | १३५४९.०० | |
| | सल्लागार फी | ४२५२५०.०० | |
| | प्रवास खर्च | १९६८५१.५० | |
| | वार्षिक अहवाल खर्च | ६६४३९.०० | |
| | वार्षिक मिटींग खर्च | ३८२०२.०० | |
| | सर्व्हिस चार्जेस | ५२८५०.५७ | |
| | आदरतिथ्य खर्च | ४२२६२.५० | |
| | सणसुद खर्च | २७७०७.०० | |
| | सजावट खर्च | १५८०७.०० | |
| | निवडणुक खर्च | २००००.०० | |
| | लॉकर भाडे | ६००.०० | |
| | सॉप्टवेअर खर्च | ०.०० | |
| | किरकोळ खर्च | १८७२६३.७७ | |
| | वर्गणी खर्च | ३७१८३.०० | |
| | वसुली खर्च | ५५१३.१७ | |
| | फ्रॅकिंग चार्जेस | ०.०० | |
| | जाहिरात खर्च | ३३३३३.०० | ३६३६२०३.७७ |
| ८२६५१०.०० | ११) तरतुदी | | |
| | संशयित बुडीत कर्ज निधी तरतुद खर्च | १००००००.०० | |
| | स्टँडर्ड असेट तरतुद खर्च | ०.०० | |
| | सरकारी रोखे अर्मोटरायझेशन खर्च | २६०४०.०० | १०२६०४०.०० |
| १२४५९२२.०० | १२) इन्कम टॅक्स | २३६०७७९.०० | २३६०७७९.०० |
| ३१३८४८८.६० | १३) नफा | ३३९२३१८.०४ | ३३९२३१८.०४ |
| ४६७१०४५७.५६ | एकूण | | ५८८४९४००.६२ |

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

**सरकारी लेखापरिक्षक**

एस. आर. चौरसिया ॲन्ड कंपनी चार्टर्ड अकौटंटस्, सातारा

दि. १।४।२०१२ ते ३१।३।२०१३ अखेर

| रक्कम ३१/०३/२०१२ | उत्पन्न | रक्कम ३१।०३।२०१३ | रक्कम ३१।०३।२०१३ |
|---|---|---|---|
| ४६७१०४५७.५६ | एकूण | | ५८८४९४००.६२ |

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सौ. गीता ग. रसाळ**
उपाध्यक्षा

**सौ. चेतना वि. सिन्हा**
अध्यक्षा

व सर्व संचालक मंडळ

# सन २०१३ - २०१४ चे

| खर्च | ३१/३/२०१३ चा अंदाजे खर्च | ३१/३/२०१३ प्रत्यक्ष खर्च | ३१/३/२०१३ चा जादा खर्च | २०१३-२०१४ चा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| व्याज दिले | | | | |
| १) ठेवीवरील | ३८२२३०८७.०० | ३७१६४५७१.६५ | ०.०० | ४६५११४९५.०० |
| २) बँक ओ.डी. वरील | ५०००००.०० | ८९२८१.०० | ०.०० | २८००००.०० |
| सेवक पगार बोनसखर्च, सेवक विमा | ६५०००००.०० | ६८११६३६.०० | ३११६३६.०० | ८००००००.०० |
| छपाई, स्टेशनरी व जाहीरात खर्च | ५०००००.०० | ३३५९७८.६६ | ०.०० | ५०००००.०० |
| एजंट कमिशन | २५०००००.०० | २४७३३९२.२६ | ०.०० | ३००००००.०० |
| पोस्टेज व टेलीफोन खर्च | ३५००००.०० | ३३८०३१.०० | ०.०० | ४५००००.०० |
| लाईट, ऑफिस भाडे, विमा व कर खर्च | १८०००००.०० | ३८८५८५०.०० | २०८५८५०.०० | ५००००००.०० |
| संचालक मिटींग व प्रवास भत्ते | २०००००.०० | १०४७५६.०० | ०.०० | २०००००.०० |
| सेवक प्रशिक्षण खर्च | १०००००.०० | १२९०७४.०० | २९०७४.०० | २०००००.०० |
| वार्षिक अहवाल व सभा खर्च | १५००००.०० | १०४६४१.०० | ०.०० | २०००००.०० |
| ऑडीट फी व ऑडीट खर्च | ४०००००.०० | २१००७९.०० | ०.०० | ३५००००.०० |
| शिक्षण निधी तरतूद | १५०००.०० | १००००.०० | ०.०० | १५०००.०० |
| घसारा व डेडस्टॉक दुरुस्ती खर्च | १८०००००.०० | १७१५५८१.५० | ०.०० | २१०००००.०० |
| इतर तरतूदी | १२०००००.०० | १०२६०४०.०० | ०.०० | १५०००००.०० |
| बँक प्राथमिक खर्च | १०००००.०० | ०.०० | ०.०० | २०००००.०० |
| इतर खर्च | २५०००००.०० | १०५८१७०.५१ | ०.०० | १५०००००.०० |
| नफा | ४४३८९२७.०० | ३३९२३१८.०४ | ०.०० | ४८३०७४३.०० |
| | ६१२७७०१४.०० | ५८८४९४००.६२ | २४२६५६०.०० | ७४८३७२३८.०० |

# अंदाज पत्रक

| उत्पन्न | ३१/३/२०१३ चे अंदाजे उत्पन्न | ३१/३/२०१३ प्रत्यक्ष उत्पन्न | ३१/३/२०१३ चे जादा उत्पन्न | २०१३-२०१४ चे अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| व्याज आले | | | | |
| १) कर्जावरील | ५०७०४०५०.०० | ४८७८३३७७.१९ | ०.०० | ६३०१५५७५.०० |
| २) गुंतवणुकीवरील | २०८०१६८.०० | २७९६४७३.०० | ७१६३०५.०० | २७००६६७.०० |
| ३) सरकारी रोख्यावरील | ७५०५२४६.०० | ६९२९६९५.९४ | ०.०० | ७८७६९४६.०० |
| लाभांश | ५०.०० | ६५.०० | १५.०० | ५०.०० |
| कमिशन | १०००००.०० | १०३४९५.४९ | ३४९५.४९ | १५००००.०० |
| लॉकर भाडे | १२५००.०० | १०५००.०० | ०.०० | २४०००.०० |
| इतर उत्पन्न | ४०००००.०० | १८१७६०.०० | ०.०० | ३५००००.०० |
| सर्व्हिस चार्जेस | ४०००००.०० | ४३५५.०० | ०.०० | १०५०००.०० |
| स्टेशनरी | ०.०० | १२२०४.०० | १२२०४.०० | १०५०००.०० |
| फॉर्म फी | ५००००.०० | ०.०० | ०.०० | १०५०००.०० |
| चेक बुक चार्जेस | २५०००.०० | ७७५०.०० | ०.०० | १०५०००.०० |
| सरकारी रोख्यावरील उत्पन्न | ० | १९७२५.०० | १९७२५.०० | ३०००००.०० |
| | ६१२७७०१४.०० | ५८८४९४००.६२ | ७५१७४४.४९ | ७४८३७२३८.०० |

# आभार

सध्याच्या बँकींग क्षेत्रातील जगातील स्पर्धेमध्ये वाढती जबाबदारी स्वीकारुन, अग्रेसर राहण्याचा विश्वास आपणा सर्वांमध्ये निर्माण झाला आहे. विविध प्रकारच्या ठेवी व कर्जवाटपाच्या योजना राबवून सभासदांची आर्थिक व सामाजिक प्रगती करताना त्यांच्या शैक्षणिक व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावयाचे आहे. या कामात सर्व सहकारी संस्था,संचालिका,सेवकवर्ग, सभासद, ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक यांचे पुर्ण सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

मी वैयक्तिकरित्या भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर मा. श्री. रघुराम राजन, मा. श्रीमती उषा थोरात माजी डेप्युटी गव्हर्नर, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई, मा.डॉ. श्री. के. सी. चक्रवर्तीसाहेब, डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक,मुंबई, मुख्य महाप्रबंधक मा.श्रीमती सुरेखा मरांडी,महाराष्ट्र राज्याचे सहकारी आयुक्त व सहकार संस्था निबंधक मा.श्री. मधुकरराव चौधरी, श्रीमती मीना हेमचंद्र, प्रिन्सीपल, सीजीएम, कॉलेज ऑफ अॅग्रिकल्चरल बँकिंग, पुणे, श्री. राजगोपाल देवरा, सहकार सचिव, महाराष्ट्र राज्य, मा. सहकार आयुक्त पुणे, मा. श्री. दिनेश ओऊळकर, अतिरिक्त सहकार आयुक्त पुणे, मा. श्री. प्रभाकर देशमुख कृषी आयुक्त पुणे, मा.डॉ. एन. रामास्वामी जिल्हाधिकारी, सातारा, मा. श्री. आनंदराव कटके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा, मा. श्री. के. एम. प्रसन्ना, पोलीस अधिक्षक, मा. श्री. अभिजीत बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा मा. श्री. विकास जाधव, सहा. निबंधक सहकारी संस्था, दहिवडी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे आजी माजी अधिकारी वर्ग, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन, मुंबई, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, मुंबई, बँक ऑफ इंडियाचे अधिकारी वर्ग, सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशन, सातारा, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.,सातारा, आय.डी.बी.आय., एस.बी.आय.बँक, अॅक्सीस बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सीडबी मुंबई, श्रीमती नैनालाल किडवाई, एचएसबीसी च्या भारतातील प्रमुख व विभागीय सरव्यवस्थापक, अॅक्सेंचर, कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग,कॅनडा, ब्रिटीश एशिया ट्रस्ट यु.के. जी आय झेड, बोनिटा ट्रस्ट, यु.के. दसरा सामाजिक संस्था, अॅक्शियॉन मायक्रोफायनान्स, कायदेविषयक सल्लागार, लेखापरिक्षक, अंर्तगत लेखापरिक्षक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. वडूज विभाग, उपविभाग वडूज, दहिवडी, लोणंद, वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा वार्ताहार, ओबीसी महामंडळ, सातारा जिल्हा कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच बँकेच्या प्रगतीस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रितीने सहकार्य कणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे हार्दीक आभार !

धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

आपली स्नेहांकित

**श्रीमती चेतना विजय सिन्हा**

अध्यक्षा

## माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

### बँकेची प्रगती

| अ. क्र. | तपशील | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | २३५० | २६१३ | ३०५८ | ४५६७ | ५९६१ | ७६३० | ९३९२ | ११३६६ | ११८७१ | १२२२० | १४०५३ |
| २ | भागभांडवल | ३०.५४ | ३५.२२ | ४२.८६ | ६९.१९ | १०२.३१ | १४८.२० | १८३.५४ | २२३.४२ | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ |
| ३ | एकूण ठेवी | ३६७.९० | ५००.०३ | ६३०.७४ | ८२६.२६ | १०३०.३४ | १३२६.४६ | १७८२.३० | २७२१.५६ | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.११ |
| ४ | एकूण कर्जवाटप | २६४.२० | ३५२.३३ | ४३३.५३ | ६११.६० | ७६५.६३ | ८५९.३५ | ९९०.५८ | १४४२.१४ | २२४०.९९ | २६४१.८३ | २८५३.५९ |
| ५ | गुंतवणूक | ९८.६३ | ११६.६६ | १७७.३२ | ११८.३८ | २५८.९५ | ५५३.८९ | ८७५.११ | १०२९.९३ | ८३९.६१ | १२११.३३ | १७८७.३५ |
| ६ | खेळते भांडवल | ४०४.७७ | ५४५.६३ | ६८६.८८ | ९१५.३५ | १२३३.०३ | १६२८.९६ | २११४.११ | ३०८४.५३ | ३७३३.१५ | ४४९१.३१ | ५३७०.५३ |

# माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

## बँकेची प्रगती

| अ. नं. | तपशील | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | २३५० | २६१३ | ३०५८ | ४५६७ | ५९६१ | ७६३० | ९३९२ | ११३६६ | ११८७१ | १२२२० | १४०५३ |
| २ | भागभांडवल | ३०.५४ | ३५.२२ | ४२.८६ | ६९.१९ | १०२.३१ | १४८.२० | १८३.५४ | २२३.४२ | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ |
| ३ | एकूण ठेवी | ३६७.९० | ५००.०३ | ६३०.७४ | ८२६.२६ | १०३०.३४ | १३२६.४६ | १७८२.३० | २७२१.५६ | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.१९ |
| ४ | एकूण कर्जवाटप | २६४.२० | ३५२.३३ | ४३३.५३ | ६१९.६० | ७६५.६३ | ८५९.३५ | ९९०.५८ | १४४२.१४ | २२४०.९९ | २६४१.८३ | २८५३.५९ |
| ५ | गुंतवणूक | ९८.६३ | ११६.६६ | १७७.३२ | १९८.३८ | २५८.९५ | ५५३.८९ | ८७५.११ | १०२९.९३ | ८३९.६१ | १२९१.३३ | १७८७.३५ |
| ६ | खेळते भांडवल | ४०४.७७ | ५४५.६३ | ६८६.८८ | ९१५.३५ | १२३३.०३ | १६२८.९६ | २११४.१९ | ३०८४.५३ | ३७३३.१५ | ४४९१.३१ | ५३७०.५३ |

''माणदेशी मार्केटिंग महोत्सव'' २०१३ च्या स्टॉल ला भेट देऊन माणदेशीची खासियत असलेल्या जेन-घोंगडी विषयी माहिती घेताना सिनेअभिनेते मा. श्री. सदाशिव अमरापूरकर, सोबत श्रीमती चेतना सिन्हा व श्री. विजय सिन्हा.

मा. श्री. विद्याधर अनास्कर अध्यक्ष, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बॅंक्स् फेडरेशन लि. मुंबई यांच्या समवेत श्रीमती चेतना सिन्हा.




श्रीमती चेतना सिन्हा यांना महिलांमध्ये आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणलेबद्दल
''लोरियल पॅरिस फेमिना'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले सोबत सिनेअभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन.

पाणी साठवण बंधाऱ्याचे भूमीपूजन करताना
मा. आमदार श्री. जयकुमार गोरे

माणदेशी फौंडेशनचा पाणी साठवण बंधारा उपक्रम.

माणदेशी बँक वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या ''माणदशी मार्केटिंग महोत्सवास''
मा. खा. श्री. छ. उदयनराजे भोसले यांनी भेट देऊन उद्योजिका महिलांच्या व शेतकऱ्यांच्या भावना
जाणुन घेतल्या त्या प्रसंगी चे छायाचित्र.

मध्य पूर्व प्रदेशातील ओमानच्या महिला अधिकारी फिरत्या व्यवसाय शाळेची पुळकोटी येथे पाहणी करताना छायाचित्र.

८ मार्च २०१३ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून माणदेशी तर्फे १०० शाळकरी मुलींना सायकल वाटप.

सिनेअभिनेत्री स्मिता तळवळकर यांनी माणदेशीस महोत्सवास भेट देऊन कार्याची माहिती घेतली त्याप्रसंगीचे छायाचित्र सोबत सौ. रेखा कुलकर्णी व बँकेच्या संचालिका सौ. राणी गोरड व सौ. ललिता पोळ

आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र म्हसवड, भूमी पूजन कार्यक्रम प्रसंगी मा. ना. श्री. राधाकृष्ण विखेपाटील कृषि व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. आ. श्री. जयकुमार गोरे विधानसभा सदस्य, माण-खटाव तसेच मा. ना. श्री. आनंदराव पाटील उपाध्यक्ष, कृष्णाखोरे विकास महामंडळ.

न्यूयॉर्क येथे झालेल्या ''क्लिटंन ग्लोबल इनिशिएटिव्ह'' कार्यशाळेप्रसंगी
अमेरिकेचे माजी अध्यक्ष मा. बिल क्लिटंन, समवेत श्रीमती चेतना सिन्हा.

**माण देशी**
**बँक**

Under Certificate of Posting

प्रेषक :
**श्रीमती चेतना सिन्हा**
अध्यक्षा, माण देशी महिला बँक लि.,
म्हसवड, ता. माण, जि. सातारा.
फोन : (०२३७३) २७०१४१,
फॅक्स : (०२३७३) २७०७८८
website : www.manndeshibank.com
email : manndeshi.mahila@rediffmail.com

मुद्रक :
**ओम प्रिंटर्स, म्हसवड**
फोन : (०२३७३) २७०२८८

सभासद क्र. ________

बुकपोस्ट

प्रति,
सौ./श्रीमती ________________
________________
________________